# परीपत्रके व शासकिय योजना...

**जिल्हा महिला बाल कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजना.**

## १. 'माहेर योजना'

हुंडाग्रस्त स्त्रियांचे पुनर्वसन करण्यासाठी माहेर योजना शासनाने अंमलात आणली आहे. आर्थिक अथवा सामाजिक अडचणीमुळे हुंडाग्रस्त स्त्रियांना त्यांच्या माहेरच्या मंडळीकडून ज्या आधाराची मदतीची अपेक्षा असते ती मिळत नाही. तेव्हा अशा स्त्रियांसाठी ही योजना सुरू करून त्यांना माहेर उपलब्ध करून दिलेले आहे. प्रथमत: विभागिय पातळीवर नागपूर, औरंगाबाद, पुणे, मुंबई व नाशिक येथे नोव्हेंबर ८७ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

**'माहेर योजनेची कार्यपध्दती'**

१. सर्वसाधारणपणे संबंधित स्त्रीचे लग्न झाल्यापासून २ वर्षाचे आंत हुंड्याच्या करणास्तव स्त्रियांच्या छळाला सुरूवात होते. स्वयंसेवी संस्थांनी अशा हुंडाग्रस्त स्त्रियांचा शोध घ्यावा.

२. त्यांचा शोध घेतल्यानंतर हुंडाग्रस्त स्त्रि, तिचे पती व इतर कौटूंबिय यांच्या सल्ल्याने उभयतात समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न स्वयंसेवी महिला मंडळांनी करावा.

३. हुंडाग्रस्त स्त्रि माहेर संस्थेत दाखल होण्यापूर्वी सर्व जबाबदारी महिला मंडळाची असेल. परस्पर सामंजस्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यानंतरच संबंधित महिला माहेर योजनेत देण्यासाठी जिल्हा दक्षता समितीशी संपर्क साधावा. स्वयंसेवी संस्था याबाबत प्रत्यक्षात काय प्रयत्न करीत आहेत हे कळावे म्हणून त्यांनी रोजनिशी लिहावी. ती दरमहा जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी यांना सादर करावी.

४. सामंजस्याचे सर्व प्रयत्न विफल झाल्यावर महिलेला माहेर योजनेत प्रवेश मिळेल. हुंडाग्रस्त स्त्रियांना या योजनेद्वारे दोन वर्ष निवारा मिळेल. त्यांना आपला ५ वर्षे वयापर्यंतच्या अपत्यासह संस्थेत राहता यईल. प्रवेश दिल्या गेल्यानंतर अशा महिलेचा अभ्यास करून ती हुंडाग्रस्त आहे का ? याचा शोध घेतल्या जाईल व हुंडाग्रस्त स्त्रियांचा प्रवेश संस्थेत कायम ठेवण्यात येईल.

५. संस्थेत प्रवेश मिळण्यापूर्वी हुंडाग्रस्त स्त्रियांची संपूर्ण माहिती जिल्हा दक्षता समिती विभागिय स्तरावरील समितीकडे पाठविले व तिला संस्थेत प्रवेश देण्यासाठी शिफारस करील.

६. निवाऱ्याशिवाय प्रवेशीतांना, मानसोपचार सहाय, वैद्यकिय मदत, कायदे विषयक सल्ला व व्यवसाय प्रशिक्षण इत्यादी सेवा उपलब्ध करून व अंतिमतः तिचे पुनर्वसन केले जाईल.

संघस्थितीत महिला मंडळांना कोणतीही आर्थिक मदत शासनाकडून मिळणार नाही. महिला मंडळांनी स्वयंस्फूर्त काम करावे. त्यांच्या रोजनिशा म्हणजेच केलेले काम व त्यातील अडचणी विचारांत घेतल्यानंतर पुढील धोरण ठरविल्या जाईल.

पुनर्विवाह करण्यासंबंधी स्त्रीच्या सल्ल्याने प्रयत्न केले जातील व पुनर्विवाहास प्रोत्साहन दिले जाईल.

हुंडाग्रस्त स्त्रिस स्वतःचा छोटासा उद्योग त्यांना सुरू करावयाचा असल्यास आवश्यक ते मार्गदर्शन व सहा-य मिळू शकेल.

सासरच्या मंडळी विरूध्द पोलिसमध्ये गुन्हे दाखल करण्यासाठी महिला पोलिस सुरक्षा विभागाकडून आवश्यक ते सहा-य मिळू शकेल.

सदर योजनेत शासनाने सुधारणा केली असून या योजने अंतर्गत निराधार निराश्रित परित्यक्ता महिलांना शासकिय व स्वयंसेवी संस्थामध्ये प्रवेश संस्थेमार्फत व संस्थेतील लाभार्थीना / स्वाभिमानाने स्वतःच्या आयुष्याची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न सुरू करण्याच्या हेतूने एक वर्षापुरते दरमहा रू २५०/- इतके अनुदान देण्यात येत आहे. लाभार्थीस खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून अनुदान मंजूर करण्यात यावे.

१. लाभार्थी महिलेस दरमहा रू २५०/- अनुदान राहील.

२. लाभार्थी सोबत मुले-मुली असल्यास पहिल्या अपत्यास दरमहा रू. १५०/- दुसऱ्यांस रू. १००/- मानधन मिळेल.

३. लाभार्थीचा संस्थेतील वास्तव्याचा कालावधी कमीत कमी ३० दिवसाचे असणे आवश्यक आहे.

लाभार्थीचा संस्थेतील वास्तव्याचा कालावधी १० दिवसापेक्षा जास्त असल्यास व्यवसायिक प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिल्या जाते.

गरजू लाभार्थी खालील संस्थेत प्रवेश घेऊ शकतात.

## २. शासकिय निरिक्षण गृह :-

बाल न्याय अधिनियम १९८६ अंतर्गत १८ वर्षाखालीत मुलगा व २० वर्षाखालील मुलीच्या अनाथ, उन्मार्गी लागलेल्या व तसेच ज्यांचे पालक आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे ज्या मुलांचे पालणपोषण - संगोपण व संरक्षण शिक्षण योग्य पध्दतीने करू शकत नाहीत, अशा मुलांच्या निवास, भोजन, शिक्षणाची पुनर्वसनाची व्यवस्था ही शासकिय निरीक्षण गृहामार्फत केली जाते.

## ३. निराधार निराश्रित मुलांसाठी बालसदन

स्वयंसेवी संस्थामार्फत निराधार दोन्ही पालक नसलेल्या किंवा पालक असलेल्या मुला मुलीसांठी बालसदन योजनेद्वारे त्यांचे संगोपन व पुनर्वसन केल्या जाते. निराधार मुलांना कुटूंब मिळावे या हेतूने प्रत्येक १० मुलांचे एक युनिट तयार करून त्यामध्ये एक गृहमातेची नेमणूक केल्या जाते. अशा प्रकारचे बालसदन चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस विभागाकडून दरमहा रू ४५०/- एवढे अनुदान विभागाकडून दिले जाते.

सदर योजना राबवू इच्छिणाऱ्या स्वंयसेवी संस्थाने जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी यांचे कार्यालयात संपर्क साधावा.

सदर योजना राबवू इच्छिणाऱ्या स्वयंसेवी संस्थाने सोबत जोडलेल्या फार्ममध्ये संपूर्ण माहिती भरून जिल्हा महिला बाल कल्याण विरूध्द गुन्हे दाखल करून देण्यापर्यंत सर्व मदतीची तरतूद माहेर या योजनेखाली हुंडाग्रस्त स्त्रिस मिळते.

## ४. विद्यावेतन :-

आर्थिकदृष्या कमकुवत कुटूंबातील मुलींना नर्सिग, पंचिंग टेलिफोन ऑपरेटर, आय.टी.आय इत्यादी व्यावसायिक प्रशिक्षणाच्या कालावधीत द.म.रू १००/- प्रमाणे विद्यावेतन दिले जाते. प्रशिक्षण शासनमान्य संस्थेत असावे, अनुदान मंजूरीचे अधिकार जिल्हा महिला बाल कल्याण अधिकाऱ्यांना आहेत.

## ५. विधवा महिलेच्या मुलीला विवाहासाठी अनुदान :-

अनाथ निराश्रित परित्यक्ता विधवा स्त्रियांना त्यांच्या एका मुलीच्या विवाहासाठी रू २०००/- इतके अनुदान देण्यात येते. अनुदान मंजुरीचे अधिकार जिल्हा महिला बाल कल्याण अधिकाऱ्यांना आहेत. (एस. डव्लु. आय. -२१७८१९७८४/(तीन)/नऊ दि. २७ नोव्हेंबर१९७८ व एस डव्लु आय - १०८५(१९४)/सीए-३, दि ६ मार्च १९८६)

## ६) निराधार निराश्रित महिलांना स्वयंरोजगारासाठी अनुदान :-

आर्थिकदृष्या कमकुवत गटातील महिलेला, खाद्यपदार्थ तयार करून विकणे, मण्यांच्या वस्तू करणे, भाजीपाला फळे विकणे इत्यादी व्यवसायासाठी रू. ५००/- अनुदान एकदाच दिले जाते. हे अनुदान मंजूरीचे अधिकार जिल्हा महिला बाल कल्याण अधिकाऱ्यांना दिले आहेत. ही योजना १९८५ पासून सुरू करण्यात आली आहे.

टिप: वरील सर्व योजनांच्या संदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा महिला बाल कल्याण अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात यावा.

**जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीमार्फत राबवावयाच्या योजना.**

**१. महिलांना शिलाई मशिन पुरविणे. :-**

१. प्रति महिला २०००/- खर्च मर्यादित.

२. लाभार्थी स्वहिस्सा १० टक्के असावा.

**२. शाळेत जाणाऱ्या मुलींना सायकली पुरविणे. :-**

१. घर ते शाळा हे अंतर किमान २ कि.मी. असावे.

२. खर्च मर्यादा प्रति सायकल रू १५००/- व लाभार्थी स्वहिस्सा १० टक्के असावा.

**३. अति कुपोषित मुलांसाठी पुरक आहार पुरविणे. :-**

१. ज्या ठिकाणी एकात्मिक बाल विकास सेवा प्रकल्प योजना राबविली जात नाही अशाच ठिकाणी योजना राबवावी.

२. प्रती मुलावर दर दिवसासाठी जास्तीत जास्त रू २ फक्त आहार खर्च करण्यात यावेत.

३. कर्मचाऱ्यांचे मानधन अथवा साहित्य खरेदीवर खर्च करण्यात येऊ नये.

४. स्थानिक महिला मंडळामार्फत शक्यतो पुरक आहार पुरविण्यात यावा.

**४. बालवाड्यांना व अंगणवाड्यांना शैक्षणिक किंवा खेळाचे साहित्य पुरविणे. :-**

१. प्रति केंद्रासाठी जास्तीत जास्त रू १०००/- खर्च करण्यात यावेत.

२. ज्या केंद्राना पूर्वी साहित्य पुरविण्यात आलेले आहे, त्यांना परत साहित्य पुरविण्यात येवू नये.

३. ५ वर्षानंतरच पुन्हा त्याच बालवाडीस/अंगणवाडीस साहित्य पुरविता येईल.

५. **गरीब, महिलांना स्वयंरोजगारासाठी अनुदान देणे. :-**

१. रेशिम उद्योग, मशरूम उत्पादन, भरत काम, पिको, फॉल, कुक्कूटपालन, संगोपालन, एम्ब्रॉयडरी, फलोत्पादन, भाजीपाला, संकरित गाई, म्हशी, शेती अवजारे इ. साठी शक्यतो अनुदान देण्यात यावे.

२. प्रती लाभार्थी रू १०,०००/- पर्यंत अनुदान देण्यात यावे.

३. प्रती लाभार्थी त्यांचा स्वहिस्सा म्हणुन १० टक्के रक्कम घेण्यात यावी.

६. **शाळा सोडलेल्या मुली व महिलांना तांत्रिक प्रशिक्षणासाठी मदत. :-**

१. प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षापर्यंत असावा.

२. परिचारिका , संगणक, टंकलेखन, बालवाडी इ. प्रशिक्षण देण्यासाठी पुस्तके फी आर्थिक मदत देण्यात यावी.

३. प्रति लाभार्थी प्रशिक्षणास रू ४०००/- पर्यंतच आर्थिक मदत देण्यात यावी व यापैकी निम्मी रक्कम प्रशिक्षण संपल्यानंतर द्यावी.

७. **महिला मंडळामार्फत किंवा स्वयंसेवी संस्थांमार्फत लहान मुलांना दिवसभर सांभाळण्यासाठी पाळणाघरे चालविणे. :-**

१. पाळणाघरात किमान दहा मुले असावीत.

२. योजनेचा खर्च, आयाच्या मानधनावर व मुलांच्या आहारावर करण्यात यावा.

३. एका आया सेविकेला जास्तीत जास्त ४००/- प्रति महिला मानधन द्यावे व यासाठी किमान ५ मुलांचा सांभाळ करावा.

४. प्रति मुल प्रति दिवस रू २/- पर्यत आहार/दुधावर खर्च करावे. उर्वरित आहार पालकांनी द्यावा.

५. दररोज किमान ६-८ तास पाळणाघर सुरू असावे.

६. पाळणाघराच्या बरोबर संडास-बाथरूम आवश्यक आहे. तसेच पाण्याची सोय आवश्यक आहे.

७. पाळणाघरासाठी जागा ग्रामपंचायतींनी द्यावी तसेच स्टोव्ह, गादी, भांडी इ. वरचा खर्च महिला संस्थेने स्वत: करावा.

८. **विधवांच्या पुनर्विवाहासाठी अनुदान देणे. :-**

१. प्रति लाभार्थी रू ५०००/- अनुदान देण्यात यावे.

९. **एक किंवा दोन मुलीनंतर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेण्या-या कुटूंबांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.:-**

१. कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रू २४०००/- च्या आत असावे.

२. एक मुलानंतर जास्तीत जास्त रू ५०००/- प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात यावे.

१०. **अनाथ / निराश्रित मुलांना दत्तक घेणा-या पालकांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे.**

१. मुलांना दत्तक घेणाऱ्या पालकांना रू २०००/- प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात यावे.

२. दत्तक घेण्याबद्दल कोर्टाचे आदेश असावेत.

११. **एकूण खर्चापैकी प्रसिध्दी, पेंडॉल इ. दर खर्च १० टक्के पेक्षा जास्त नसावा व औषधावर खर्च किमान ९० टक्के असावा.**

१२. **अपंग मुली व स्त्रियांना कृत्रिम अवयव बसविणे.:-**

१. अपंग मुली व स्त्रियांना आवश्यकतेनुसार रू ५०००/- पर्यंतचे कृत्रिम अवयव व उपकरणे पुरविण्यात यावे.

२. लाभार्थीकडून त्यांचा स्वहिस्सा म्हणून १० टक्के रक्कम घेण्यात यावी.

३. लाभार्थीचे आर्थिक उत्पन्न रू २४०००/- चे आत असावे.

१३. **महिला मंडळामार्फत वाचनालय व प्रौढ शिक्षण शिबीरे घेणे. :-**

१. प्रौढ शिक्षणासाठी किमान १० महिलांच्या एका गटाला जास्तीत जास्त रू १०००/- अनुदान द्यावे . सदर खर्च साहित्य किंवा शिक्षकांच्या मानधनावर असावा.

१४. **हुंडा निर्मूलनासाठी सामुहिक विवाह आयोजित करणे. :-**

१. प्रति जोडपी खर्च रू ४०००/- पेक्षा जास्त नसावा.

२. किमान १० जोडप्यांचे विवाह आयोजित करावे.

१५. **निराश्रित महिलांना घरकुलासाठी आर्थिक मदत. :-**

१. ज्या महिला निराधार किंवा विधवा आहेत व ज्यांना स्वत:चे घर नाही त्यांना मदत द्यावी.

२. प्रति महिला रू ६०००/- पर्यत मदत असावी.

## १६. १२ वी पर्यत शाळेत जाणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहे चालविणे.:-

१. प्रति मुली प्रति महिला रू. ५०० पर्यत अनुदान द्यावे. याशिवाय कोणत्याही बाबीवर विशेषत: पगार भाडे इ. अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

२. स्वयंसेयी संस्थांमार्फत वसतिगृह चालवावे.

टिप : वरील योजनांपैकी जिल्हा परिषदेमार्फत कोणत्या योजना राबवाव्या या बाबतचा निर्णय संबंधीत जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीमार्फत घेतला जातो.

# समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन पर आर्थिक सहा-य

**१. अंमलबजावणी कार्यालय**

समाज कल्याण अधिकारी , जिल्हा परिषद.

**२. उदिष्टे व स्वरूप :**

मागासवर्गिय व बिगर मागासवर्गिय युवक युवतीच्या मनात ममतेच्या भावनेतून समता रूजावी, त्यांच्यात राष्ट्रीय एकात्मता ही भावना दृढ व्हावी, समाज एकसंघ राहावा व त्यांच्यात मातृभाव निर्माण होऊन जाती निर्मूलन व्हावे म्हणून ही योजना राबविली जाते. त्यासाठी आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना महाराष्ट्र शासनामार्फत प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदत दिली जाते.

**३. लाभाचे स्वरूप :-**

वरील योजनेखाली संबंधित आंतरजातीय विवाहीत जोडप्यांचा सत्कार केला जातो. विवाहीत जोडप्यास प्रोत्साहनपर रू १५०००/- आर्थिक सहाय्य दिले जाते. त्यातील रू ७५००/- रोख रू ४०१ /- संसार उपयोगी भांडी साहित्य आणि रू १००/- स्वागत समारंभाकरीता दिले जातात.

# अत्याचाराचे बळी ठरणाऱ्या अनु. जाती अनु. जमातीच्या कुटूंबातील सदस्यांना आर्थिक सहा-य देण्याची योजना

## अंमलबजावणी कार्यालय, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

**उद्दिष्टे व स्वरूप :-** जातीयतेच्या कारणावरून झालेल्या अत्याचारांना बळी पडलेल्या

अनु. जाती, अनु जमातीच्या सदस्यांना आर्थिक सहाय करून त्यांचे पुनवर्सन करण्याची योजना.

**अटी व शर्ती :**

१. जातीयतेच्या कारणावरून अनु. जाती, अनु. जमातीच्या कुंटूंबावर / व्यक्तिवर अत्याचार घडल्यास

२. सदर गुन्ह्याची नोंद नागरी हक्क संरक्षण अधिनियमाखाली झाली असल्यास.

३. अत्याचार पिडीत व्यक्तिच्या मालमत्तेचे नुकसान झाले बाबत त्याचा पंचनामा महसूल / पोलिस खात्याकडून झालेला असावा.

४. आवश्यक त्या गुन्ह्यात अत्याचार घडलेल्या व्यक्तिवर घडलेल्या अत्याचारासंबंधात वैद्यकिय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

५. अन्याय अत्याचार घडलेल्या व्यक्ति व कुटूंबातील व्यक्ती यांच्याकडे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले अनु. जाती, अनु.जमातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. कार्यकारी दंडाधिकारी / उपविभागीय दंडाधिकारी अनु. जाती., अनु.जमातीच्या व्यक्तिवर अन्याय, अत्याचार घडला असल्यास त्याची नोंद संबंधित पोलिस स्टेशनला झाली असल्यास गुन्हाच्या स्वरूपावरून आर्थिक व वस्तूच्या स्वरूपात मदत दिली जाते.

## शासकिय अनुदान तत्वावर स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना

**१. आधार केंद्र :-**

१८ ते ४० वयोगटातील निराश्रित महिला, कुमारी माता, हुंडाग्रस्त स्त्रिया, परित्यक्ता अशा स्त्रिया व मुलींना अन्न, वस्त्र व निवारा, प्रशिक्षण, औषधोपचार, कायदेशीर सल्ला उपलब्ध करून देण्यासाठी स्वयंभावी संस्थांमार्फत आधारकेंद्रे चालविण्यात येतात. या आधारगृहांमध्ये वर नमूद केलेल्या प्रवर्गातील महिलांना त्यांच्या इच्छेनुसार प्रवेश दिला जातो. संस्थेमध्ये अशी महिला दाखल झाल्यानंतर तिच्या समस्येचा अभ्यास समझोता घडवून आपणे, कोर्टामार्फत कायदेशीर सल्ला देणे, पुनर्वसनाच्या दृष्टीने व्यावसायिक प्रशिक्षण देणे इत्यादी गोष्टी या संस्थांमार्फत केल्या जातात. या संस्थांना राज्य शासनामार्फत प्रति लाभधारकांसाठी रू ४५०/- इतके परिक्षण अनुदान देण्यात येते. तसेच

संस्थेतील महिलांना सुधारीत माहेर योजनेनुसार रू २५०/- इतके रोख अनुदान देण्यात येते. तिच्यासोबत मुले असल्यास पहिल्या मुलाला रू १५०/- व दुस-या मुलाकरीता रू १००/- इतके रोख अनुदान एका वर्षापर्यंत देण्यात येते . राज्यात अशा १४ संस्था आहेत.

**२. महिला मंडळामार्फत महिला प्रशिक्षण केंद्रे चालविणे :-**

महिला मंडळामार्फत निराधार , विधवा, परित्यक्ता व अल्प उत्पन्न गटातील महिलांसाठी प्रशिक्षण केंद्रे चालविण्यात येतात. यामध्ये टेलरिंग लोकर, विणकाम, बुक बायडिंग फलोत्पादन, रेशिम उद्योग, भाजीपाला उत्पादन, कृषी संबंधी व्यवसाय, बाहुली व खेळणी तयार करणे, भरतकाम, पिको व फॉल लावणे, बेकरी उत्पादन, पापड-मसाले तयार करणे, रेडिओ व टि.व्ही. दुरूस्तीकरणे, विजेच्या उपकरणांची दुरूस्ती, टंकलेखन इत्यादी प्रशिक्षणाचा समावेश आहे. सदर प्रशिक्षण ६ महिन्याचे एक सत्र याप्रमाणे चालविण्यात येते व महिलांना प्रशिक्षित करून त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करण्यास समर्थ बनविण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्र चालविण्यास स्वयंसेवी संस्थेला पहिल्या वेळी साधन सामग्रीसाठी रू २८५००/- अनावर्ती अनुदान देण्यात येते व त्यानंतर प्रत्येक सत्रासाठी रू २१५००/-इतके आवर्ती अनुदान देण्यात येते.

**३. सेवाघर :-**

नोकरी करणाऱ्या महिलांच्या बालकांचे संगोपनासाठी प्राथम्याने पाळणाघर चालविणे तसेच सेवा धुलाई केंद्र, इत्यादी सहाय्य सेवा पुरविणे व या सहाय्य सेवांतून गरजू महिलांना रोजगार देणे या हेतूने प्रयोजित तत्वावर ही योजना लागू केलेली आहे. या योजनेअंतर्गत सेवाभावी संस्थांना रू १.५० लाखाच्या मर्यादेपर्यंत अनुदान एकदाच दिले आहे व १००० चौ.फुट. क्षेत्रफळाची सदनिका उपलब्ध करून दिलेली आहे. अशाप्रकारे दोन संस्थांना ही योजना राबविण्यास दिलेली आहे.

**४. बहुउद्देशिय महिला केंद्र :-**

महिलांचा विकास व उत्पन्नाकरीता विविध विषयांवरील माहिती उपलब्ध होणे गरजेचे असते. तसेच मोकळ्या वातावरणात परस्परांशी विचार विनिमय करून विचारांची देवाणघेवाण व मुक्त चिंतन सोईस्कर वेळात करता येईल. अशा तऱ्हेच्या केंद्राची महिलांना नितांत आवश्यकता आहे. तसेच महिला ज्या ठिकाणी व्यवसायिक प्रशिक्षणासंदर्भात सल्ला घेण्याकरीता जावू शकतील. तसेच वाचनालय, कायदा विषयक सल्ला नोकरी किंवा व्यवसायाच्या निवडीबाबत

सल्ला तसेच आपदग्रस्त महिलांना आधार देण्याबाबत मदत करणे. अशा सुविधा उपलब्ध व्हाव्यात या करीता राज्यात स्वयंसेवी संस्थामार्फत बहुद्देशिय महिला केंद्रे स्थापना करण्यात आलेली आहेत. सद्या राज्यात विभागिय स्तरावरील ६ जिल्हयांमध्ये अशी केंद्रे चालविण्यात येत आहेत. याकरीता स्वयंसेवी संस्थाना रू. १,३७,६००/- इतके वार्षिक अनुदान व रू. २,७४,५००/- इतके अनावर्ती अनुदान देण्यात येते.

**६. कामधेनू योजना :-**

गरजू महिलांना घरबसल्या काम मिळावे म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, इस्पितळे इत्यादी संस्थांना लागणारे गणवेश, चादरी, उशांचे अभ्रे, रोग्यांचे कपडे, फिनेल, डस्टर, झाडू, साबण, मसाले, पापड, लोणीची इत्यादी वस्तूंचा ५० टक्के पुरवठा महिला संस्थामार्फत करावा अशी अपेक्षा आहे. महिला संस्थांना सदर काम गरजू महिलांमार्फत करून घ्यावी अशी अपेक्षा आहे. या करीता संबंधित शासनाच्या संबंधित विभागाकडून सदर पुरवठ्यासंदर्भात वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निविदा सुचनांमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे उपक्रम :-

**अ) महिलांकरीता विशेष कार्यक्रम :-**

प्रशिक्षित महिला शिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण व हस्तव्यवसाय वर्ग या केंद्रावर चालविले जातात. प्रत्येक केंद्राला ३ शिवणयंत्रे पुरविली जातात. काही केंद्रावर महिलांना पुरक उद्योग मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. कुटूंब कल्याण हा कामगार कल्याणाचा अविभाज्य भाग असल्याने कुटूंब नियोजनावर आधारित व्याख्याने, परिसंवाद आयोजित केले जातात. आरोग्य शिक्षण, आदर्श माता-बालक स्पर्धा, पौष्टीक आहारासंबंधीची प्रात्याक्षिके आयोजित करण्यात येतात. तज्ञ डॉक्टरांच्याकडून बालकांची व स्त्रियांची आरोग्य तपासणी तसेच महिलांमध्ये सभाधीटपणा येण्यासाठी नाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम, खेळ व कलात्मक कार्यक्रम अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे केले जातात.

**१. मुलांकरिता विशेष कार्यक्रम :-**

प्रत्येक केंद्रामध्ये पूर्व शिक्षणाची सोय असते. केंद्रात येणा-या मुलांना दररोज आहार दिला जातो. त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संगीत सांस्कृतिक

कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. वर्षातून एकदा निसर्गरम्य ठिकाणी सहली काढल्या जातात. त्यांची वैद्यकिय तपासणी केली जाते. याशिवाय काही केंद्रावर पाळणागृहेही चालविली जातात.

**२. बाल सेवा कुलयोजना :-**

कामगारांच्या मुला-मुलीवर सुसंस्कार करून त्यांचे बालपण परिपक्व करणे, त्यांच्या शारीरिक, बौध्दीक, मानसिक व शैक्षणिक इत्यादी बाबींचा सर्वांगिण विकास घडवून आणणे व त्यामधून आदर्श अशी भावी पिढी निर्माण करता यावी या हेतूने सर्व गट कार्यालयाच्या स्तरावर 'बालसेवा कुल' योजना राबविण्यात येत आहे.

**३. माता बालक आरोग्य चिकित्सा केंद्र :-**

माता आणि त्यांच्या मुलांना मोफत आरोग्य चिकित्सा करून घेता यावी म्हणुन ललित कला भवन , वरळी मुंबई येथे प्रायोगिक स्तरावर मोफत माता बालक आरोग्य चिकित्सा केंद्र चालविण्यात येतात.

**४. शिष्यवृत्त्या :-**

कामगारांच्या मुलांना शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने सहा-यभूत व्हावे, त्याचप्रमाणे त्यांच्या शिक्षणाचा खर्च त्यांच्या पालकांवर पडू नये म्हणुन शिष्यवृत्ती दिली जाते.

## उल्लेखनीय कार्याकरिता महिलांकरीता पुरस्कार :-

**१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार :-**

महिला व बाल कल्याण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या समाजसेविकांना, संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार राज्यस्तरिय पुरस्कार, जिल्हास्तरिय पुरस्कार व विभागिय स्तरावर स्वंयसेवी संस्थांना पुरस्कार अशा तीन प्रकारे देण्यात येतो. हा पुरस्कार महिला व बाल कल्याण विभागामार्फत देण्यात येतो.

**२. जिजामाता कृषीभूषण पुरस्कार :-**

संपूर्ण महाराष्ट्रात कृषीक्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या दोन महिला शेतकऱ्यांना जिजामाता कृषीभूषण पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार कृषी विभागामार्फत देण्यात येतो. याकरीता कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा.

३. **सावित्रीबाई फुले पुरस्कार :-**

प्रत्येक विभागिय शिक्षण उपसंचालक स्तरावरील प्रत्येक शैक्षणिक विभागातून एक याप्रमाणे ७ महिला शिक्षकांना आदर्श स्त्रि शिक्षिका पुरस्कार म्हणुन सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रदान करण्यात येतो. हा पुरस्कार शालेय शिक्षण विभागातून देण्यात येतो. याकरीता विभागिय शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा.

## केंद्रीय स्तरावरील योजना :-

**योजना क्र. १ : अनौपचारीक शिक्षण**
**शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय**

**योजनेचा उद्देश** : ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुले शिक्षणक्षम वयातील असूनही दारिद्र्यामुळे व अज्ञानामुळे शाळेत जावू शकत नाहीत. अशा मुलांना निवडून, त्यांच्या सोईच्या वेळी वर्गाबाहेर त्यांना शिकविण्यासाठी शिक्षण विभागाने ही योजना तयार केली आहे.

**पात्र संस्था** : किमान ३ वर्षापूर्वी नोंदणीकृत असलेल्या समाजसेवी संस्था.

**मदतीचे स्वरूप** : या योजनेखाली शिक्षकांना मानधन प्रशासकिय खर्च, व शैक्षणिक साहित्यावरील खर्च यासाठी १०० टक्के अर्थसहा-य देण्यात येते.

**अर्ज कोठे करावा** : राज्य शासनामार्फत शिक्षण विभाग मानव संसाधन विकास मंत्रालय , शास्त्री भवन , नवी दिल्ली.

**योजना क्र. २ : अपंग शिक्षण**
**शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय :-**

**योजनेचा उद्देश** : अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण देणे.

**योजनेचे स्वरूप** : अपंगांना त्यांच्या अपंगत्वावर मात करण्यासाठी व्यवसायिक शिक्षण देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी त्यांना उत्पन्नाची साधने उपलब्ध करून देणे.

**पात्र संस्था** : किमान ३ वर्षापूर्वी नोंदणीकृत असलेल्या सार्वजनिक न्यास किंवा संस्था.

**मदतीचे स्वरूप** : अपंगाच्या शिक्षणासाठी प्रशासकिय व शैक्षणिक खर्च १०० टक्के अर्थसहा-य देण्यात येते.

**अर्ज कोठे करावा** : शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. २ : मुलींच्या वसतीगृहांसाठी अर्थसहा-य**
**शिक्षण विभाग , मानव संसाधन विकास मंत्रालय :-**

**योजनेचा उद्देश** : मागासवर्गिय मुलींसाठी वसतीगृह चालविणे.

**योजनेचे स्वरूप** : उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी विशेषत: शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या भागातील मुलीसाठी वसतीगृह चालविणे तसेच सद्य स्थितीतील वसतीगृहांना हे अनुदान देय आहे. नविन वसतीगृहांना अनुदान देय नाही.

**पात्र संस्था** : किमान ३ वर्षापूर्वी नोंदणीकृत असलेली सार्वजनिक संस्था, न्यास.

**मदतीचे स्वरूप** : वसतिगृहासाठी निवास, भोजन व अनुषंगिक प्रशासकिय खर्चासाठी १०० टक्के (संपूर्ण) अर्थसहा-य देण्यात येते.

**अर्ज कोठे करावा** : राज्य शासनामार्फत शिक्षण विभाग , मानव संसाधन विकास मंत्रालय , शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. ३ : प्रौढ शिक्षण कार्यक्रम**
**शिक्षण विभाग , मानव संसाधन विकास मंत्रालय :-**

**योजनेचा उद्देश** : सार्वजनिक संस्थांच्या सहकार्याने राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या माध्यमातून निरक्षर लोकांना साक्षर करणे.

**योजनेचे स्वरूप** : साक्षरता कार्यक्रम राबविणे , साक्षरते नंतरचे निरंतर शिक्षणाचे कार्यक्रम राबविणे, ज्यात सोपे वाचन साहित्य पुरविण्याचे कार्यक्रम राबविणे इत्यादी.

**पात्र संस्था** : किमान ३ वर्षांपूर्वी नोंदणीकृत असलेल्या सार्वजनिक न्यास व संस्था.

**मदतीचे स्वरूप** : प्रौढ शिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी संस्थेस शैक्षणिक, दैनंदिन व प्रशासकिय खर्च (१०० टक्के) संपूर्ण अनुदान देण्यात येते.

**अर्ज कोठे करावा :** शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. ४ : क्रीडांगण विकास**
**युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय**

**योजनेचा उद्देश :** ग्रामीण भागातील माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांमध्ये खेळांचा विकास करणे.

**योजनेचे स्वरूप :** ग्रामीण भागातील माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांना खेळासाठी लागणारे साहित्य विकत घेण्यासाठी आर्थिक मदत करणे तसेच क्रीडांगण विकासासाठी आर्थिक मदत करणे.

**पात्र संस्था :** १) शाळेस विहीत आकाराचे क्रीडांगण असावे २) कमीत कमी २०० विद्यार्थी शाळेत असावेत. ३) शाळा प्रशासनामध्ये नेहमी लागणाऱ्या खेळ साहित्य खरेदीसाठी दरवर्षी १००००/- रूपये खर्च करण्याची क्षमता असावी. ४) क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी २० X २० ची खोली असावी. अनुदान मागणी जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्या स्वाक्षरीने घेणे आवश्यक आहे.

**मदतीचे स्वरूप :** या योजनेमध्ये रूपये १५ लक्ष पर्यंत अनुदान देण्यात येते.

**अर्ज कोठे करावा :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय , शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. ५ : साहस शिबीर आयोजन**
**युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय :-**

**योजनेचा उद्देश :** युवकांमध्ये जोखीम उचलण्याची व हिंमत दाखवण्याची भावना निर्माण करणे .

**योजनेचे स्वरूप :** गिर्यारोहण, वने/समुद्रामध्ये लघु मुदतीची शिबीरे आयोजित करणे.

**पात्र संस्था :** राज्य सरकार / नेहरू युवा केंद्र/शिक्षण संस्था/ स्वयंसेवी संघटना

**मदतीचे स्वरूप :** प्रत्येक लाभार्थीस ४० प्रमाणे निवास व भोजनाचा खर्च व प्रत्यक्ष प्रवास खर्च .

**अर्ज कोठे करावा :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय , शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. ६ : प्रेरणा कार्यक्रम**

**युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय :-**

**योजनेचा उद्देश :** युवकांसाठी प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करणे.

**योजनेचे स्वरूप :** प्रेरणादायी पुस्तकांची निवड करून उतारे युवकांना वितरीत करावे. तसेच विचारवंत, श्रेष्ठ लेखक व महान कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणे.

**पात्र संस्था :** स्वयंसेवी संस्था

**मदतीचे स्वरूप :** प्रत्येक लाभार्थीस ४० रूपये प्रमाणे निवास व भोजनाचा खर्च व प्रत्यक्ष प्रवास खर्च.

**अर्ज कोठे करावा -** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. ७ : महिलांसाठी वसतीगृहे**

**महिला व बाल विकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश :** शहरी व निमशहरी भागातील परित्यत्क्या, विधवा, कुमारीका असलेल्या नोकरदार महिलांसाठी चालविणे .या योजनेत ठराविक प्रमाणात अनुसूचित जाती व जमातीतील महिलांना या वसतीगृहांचा लाभ देणे बंधनकारक असते.

**योजनेचे स्वरूप :** वसतीगृह नाममात्र शुल्काने परित्यत्क्ता, विधवा, कुमारीका असलेल्या नोकरदार महिलांसाठी चालविणे. या योजनेत ठरावीक प्रमाणात अनुसुचित जाती व जमातीतील महिलांना या वसतीगृहांचा लाभ देणे बंधनकारक असते.

**पात्र संस्था :** किमान ३ वर्षापासून नोंदणीकृत असलेली सार्वजनिक संस्था, न्यास विश्वस्त मंडळ. इत्यादी.

**मदतीचे स्वरूप :** निमशहरी व शहरी भागातील वसतिगृहाच्या बांधकामासाठी जागेच्या किमतीच्या १० टक्के आणि बांधकामास लागलेल्या खर्चाच्या ७५ टक्के अनुदान केंद्र सरकार देते.

**अर्ज कोठे करावा :** राज्य सरकारच्या महिला व बालकल्याण खात्यामार्फत महिला व बालकल्याण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. ८ : सामाजिक जागरूकता निर्माण कार्यक्रम**

**महिला व बालविकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश :** ग्रामीण व दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या महिलामध्ये जागरूकता निर्माण करणे.

**योजनेचे स्वरूप** : जागरूकता शिबीरे आयोजित करणे, महिलांचे हक्क प्रश्न व समाजातील महत्त्व यांची जाणिव निर्माण करण्यासाठी तसेच पुरूषांमध्ये महिलांच्या मुद्यांच्या प्रश्नांची जाणिव निर्माण करण्यासाठी मदत करणे.

**पात्र संख्या** : २ वर्षांपासून महिला व बालविकास क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था

**मदतीचे स्वरूप** : प्रत्येक शिबीरास रू २००० प्रमाणे अनुदान

**अर्ज कोठे भरावा**- राज्याचे सोशल वेलफेअर ॲडवायजरी बोर्ड मार्फत कार्यकारी संचालक केंद्रीय समाज कल्याण बोर्ड समाज कल्याण भवन कुतुब इन्स्टीटट्युशनल एरिया, नवी दिल्ली.

**योजना क्र. ९ : महिला शिक्षणासाठी विविध अभ्यासक्रम**
**महिला व बालविकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश** : महिलांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे.

**योजनेचे स्वरूप** : १५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या महिलांना व शाळेमधून नाव काढलेल्या व अनुत्तिर्ण महिलांना बाह्यशाली विद्यार्थी म्हणुन बसविणे व त्यांचे शिक्षण पूर्ण करणे.

**पात्र संस्था** : स्वयंसेवी संस्था

**मदतीचे स्वरूप** : प्राथमिक शिक्षणासाठी ०.८९ लक्ष रूपये माध्यमिक शिक्षणासाठी १.४४ लक्ष रूपये अनुदान.

**अर्ज कोठे करावा** : राज्याचे सोशल वेलफेअर ॲडवायजरी बोर्ड मार्फत कार्यकारी संचालक केंद्रीय समाज कल्याण बोर्ड समाज कल्याण भवन कुतुब इन्स्टीटट्युशनल एरिया, नवी दिल्ली.

**योजना क्र १० : सामाजिक आर्थिक कार्यक्रम महिला व बालविकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश** : महिलांना व महिला संघटनांना उत्पादन युनिट उभे करण्यास मदत करणे.

**योजनेचे स्वरूप** : महिलांना कृषी आधारित उद्योग तयार करण्यास मदत करणे जेणे करून त्यांचे आर्थिक स्तर उंचावेल.

**पात्र संस्था** : स्वयंसेवी संस्था

**मदतीचे स्वरूप** : केंद्रीय समाज कल्याण बोर्ड मार्फत ३ लक्ष रूपयांपर्यंत अनुदान मिळू शकते, १५ टक्के रक्कम संस्थेने गुंतवावी.

**अर्ज कोठे करावा** : राज्याचे सोशल वेलफेअर ॲडवायजरी बोर्ड मार्फत कार्यकारी संचालक, केन्द्रीय समाज़ कल्याण बोर्ड, समाज़ कल्याण भवन, कुतुब इन्स्टीटट्युशनल एरिया, नवी दिल्ली.

**योजना क्र ११ : कुटूंब सल्लागार केंद्र महिला व बालविकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश** : महिलांना त्यांच्या पुनर्वसनासाठी मदत करणे.

**योजनेचे स्वरूप** : अत्याचाराने पिडीत महिलांच्या पुनर्वसनासाठी मदत करणे तसेच इतर कौटूंबिक प्रश्नासाठी महिलांना सल्ला देणे.

**पात्र संस्था** : कोणतीही नोंदणीकृत/अशासकिय/स्वयंसेवी संस्था

**मदतीचे स्वरूप** : १ लक्ष रूपयापर्यंत वार्षिक अनुदान

अर्ज कोठे करावा- राज्याचे सोशल वेलफेअर ॲडवायजरी बोर्ड मार्फत कार्यकारी संचालक केंद्रीय समाज कल्याण बोर्ड समाज कल्याण भवन कुतुब इन्स्टीटट्युशनल एरिया, नवी दिल्ली.

**योजना क्र १२ : मुख्य कर्ज महिला व बालविकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश** : महिलांचा आर्थिक सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी आर्थिक मदत करणे तसेच महिलांना व्यवसाय व नोकरी मध्ये मदत करणे.

**योजनेचे स्वरूप** : महिलांना त्यांची आर्थिक शक्ती वाढविण्यासाठी आर्थिक मदत करणे तसेच रोजगार उपलब्ध करून देणे.

**पात्र संस्था** : स्वयंसेवी संस्था/महिला विकास महामंडळ/सहकारी संस्था.

**मदतीचे स्वरूप** : प्रत्येक लाभार्थीकरीता अल्प मुदतीसाठी ५००० रूपये व दीर्घ मुदतीसाठी ७५०० रूपये अनुदान.

**अर्ज कोठे करावा**- कार्यकारी संचालक , राष्ट्रीय महिला कोष, दीनदयाल उपाध्यक्ष मार्ग, नवी दिल्ली.

**योजना क्र. १३ : बाजार निधी पुरवठा महिला व बालविकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश** : रोजगार समुह योजने मधील महिलांनी बनविलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

**योजनेचे स्वरूप** : रोजगार समुह गटामधील महिला गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारात विक्रीसाठी मदत करणे.

**पात्र संस्था** : या क्षेत्रातील अनुभव असलेली स्वयंसेवी संस्था.

मदतीचे स्वरूप- वस्तूंच्या किमतीच्या ४० टक्के पर्यंत कर्ज मिळू शकते.

**अर्ज कोठे करावा** : कार्यकारी संचालक, राष्ट्रीय महिला कोष दिनदयाल उपाध्याय मार्ग नवी दिल्ली.

**योजना क्र १४ : स्वयंरोजगारातून महिला प्रशिक्षण योजना**
**महिला व बालविकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश** : ग्रामीण, निमशहरी भागातील महिलांना स्वयंरोजगारातून प्रशिक्षण देण्यासाठी प्रकल्प उभारून त्या महिलांना प्रशिक्षित करीत असतांनाच आर्थिकदृष्टया त्यांना स्वावलंबी बनविणे असा आहे. या योजनेसाठी लाभार्थी महिला गरीब भूमिहीन अनुसूचित जाती जमाती व मागास जातीतील महिला असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येते.

**योजनेचे स्वरूप** : या योजनेअंतर्गत लघु उद्योग कुटीरउद्योग, ग्रामउद्योग, दुग्धव्यवसाय शेतीपूरक उद्योग उभारून त्यासाठी लागणाऱ्या कौशल्याबाबतचे प्रशिक्षण देणे. लाभार्थींना प्रशिक्षित करून त्यांना त्यांच्या पायावर उभे करणे. हे या योजनेचे स्वरूप आहे.

**पात्र संस्था** : समाज सेवेचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेली सार्वजनिक संस्था. न्यास कायद्याखाली नोंदणीकृत संस्था ही या योजनेअंतर्गत अनुदानास पात्र समजली जाते.

**मदतीचे स्वरूप** : केंद्र शासनाकडे महिला व बालविकास विभाग मानव संसाधन विकास खाते या योजनेअंतर्गत बांधकाम कच्चा माल प्रशिक्षण उपकरणे इत्यादींसाठी संपूर्ण सहा-य दिले जाते. प्रत्येक लाभार्थीस ८ हजार रूपये प्रमाणे अनुदान देय आहे.

**अर्ज कोठे करावा** : महिला व बालविकास विभाग राज्य सरकार मार्फत महिला व बालविकास विभाग मानव संसाधन विकास मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र १५ : महिला आहार केद्र**

**महिला व बालविकास विभाग :-**

**योजनेचा उद्देश** : निराश्रित महिला तसेच वृध्द महिलांना आश्रय देणे.

**योजनेचे स्वरूप** : समाजातील निराधार व वृध्द महिलांना त्यांचे जीवनमान सुसह्य करण्यासाठी यांचे निवास व भोजनाची व्यवस्था करणे.

**पात्र संस्था** : राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेली संस्था / रजिस्टर्ड धर्मार्थ आश्रम या योजनेसाठी पात्र आहे.

**मदतीचे स्वरूप** : या योजनेकरीता ९५ टक्के अनुदान केंद्र सरकार द्वारा दिले जाते.

**अर्ज कोठे करावा** : राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व बाल विकास विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

**योजना क्र १६ : व्यसन मुक्ती केद्र सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय :-**

**योजनेचा उद्देश** : युवकांना अंमली पदार्थांच्या सेवनापासून परावृत्त करणे.

**पात्र संस्था** : सोसायटी अधिनियम १८६० अंतर्गत रजिस्टर्ड करण्यात आलेली संस्था धर्मार्थ रजिस्टर्ड सोसायटी पात्र आहेत.

**मदतीचे स्वरूप** : या योजनेकरीता ९० टक्के अनुदान सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयातर्फे मंजूर करण्यात येते.

**अर्ज कोठे करावा** : राज्य शासनामार्फत सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. १५ : अपंगांना साधने उपलब्ध करून देणे :-**

**सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय :-**

**योजनेचा उद्देश** : शारीरिक अपंगाना विविध उपकरणे पुरवून त्यांना स्वयंपूर्ण बनविणे.

**योजनेचे स्वरूप** : भारतामध्ये १६.१५ लाख लोक शारीरिकदृष्ट्या अपंग आहेत. व त्यामुळे त्यांना शारीरिक व मानसिक विकासात अडथळा निर्माण होत आहे. या योजनेमधे अपंगांना विविध उपकरणे विकत घेण्यासाठी आर्थिक मदत केली जाते. तसेच अपंगाच्या कार्यशाळा आयोजित करून त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण केली जाते.

**पात्र संस्था** : ज्या संस्थेकडे पुरेसा कर्मचारी वर्ग आहे अशा संस्था या प्रकल्पास पात्र आहेत.

**मदतीचे स्वरूप** : ५० रूपयांपासून ते ६००० रूपयांपर्यंतच्या किंमतीची उपकरणे वाटप करण्यासाठी संपूर्ण अनुदान.

**अर्ज कोठे करावा** : राज्य शासनामार्फत सामाजिक व न्याय व अधिकारिता मंत्रालय, शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**योजना क्र. १७ : फुटपाथवर राहणाऱ्या मुलांसाठी एकात्मिक योजना सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय.**

**योजनेचा उद्देश** : लहान मुलांना निराधार होण्यापासून वाचविणे व फुटपाथवर राहणाऱ्या मुलांना राष्ट्रीय प्रवाहात सामिल करणे

**योजनेचे स्वरूप** : वेश्यांची मुले, अनाथ, रस्त्यावरील मुले तसेच झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या मुलांची शिक्षणाची सोय करणे.

**पात्र संख्या** : २ वर्षावरील नोंदणीकृत संस्था.

**मदतीचे स्वरूप** : १५ लाख रूपयांपर्यंत एकूण खर्चाच्या ९० टक्के अनुदान

**अर्ज कोठे करावा** : राज्य शासनामार्फत सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली

**योजना क्र. १८ : जनतेचे सहकार्य कपार्ट :-**

**योजनेचा उद्देश** : ग्रामीण जीवनमान उंचावण्याचा कोणताही कार्यक्रम घेणे यात ग्रामीण आरोग्य व शिक्षण कार्यक्रम इत्यादी.

**पात्र संस्था** : किमान ३ वर्षांपूर्वी नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था

**मदतीचे स्वरूप** : प्रकल्प अहवालानुसार

**अर्ज कोठे करावा** : कपार्टचे विभागिय संयोजक पश्चिम क्षेत्र विभागीय कमेटी नवजीवन ट्रस्ट कॉम्प्लेक्स, आश्रम रोड, अहमदाबाद गुजरात.

**योजना क्र १९ : प्रशिक्षण वजा उत्पादन केंद्र. नाबार्ड**

**योजनेचा उद्देश** : ग्रामीण भागातील कामगारांना नवीन तंत्रज्ञान व कौशल्याचे प्रशिक्षण

देणे व त्यांना सर्वसमावेशक उत्पादनाबाबत पूर्वतयारीसाठी व उत्पादित मालाच्या विक्रीस मदत करणे.

**योजनेचे स्वरूप** : प्रशिक्षणासाठी आवश्यक मुलभूत सुविधा उपलब्ध करून देणे. उदा. इमारत उभारणे/वसतीगृह/प्रशिक्षण सुविधा/मशीनरी/प्रशिक्षकांना प्रात्याविकास मदत करणे व पुढे प्रशिक्षण केंद्र मदर युनिट होईल या दृष्टीने तयारी करणे.

**पात्र संस्था** : स्वयंसेवी संस्था, शासकिय महामंडळे, संयुक्त उद्योग/खाजगी क्षेत्र.

**अर्ज कोठे करावा** : कार्यकारी संचालक, नाबार्ड स्टर्लींग सेंटर शिवसागर इस्टेट , एनी बेझंट रोड वरळी, मुंबई.

**योजना क्र. २० : ग्रामीण उद्योजकता विकास कार्यक्रम. नाबार्ड.**

**योजनेचा उद्देश** : ग्रामीण भागामध्ये युवकांना छोटे उद्योग लावण्यासाठी प्रशिक्षण व मदत करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत करणे.

**योजनेचे स्वरूप** : कार्यक्षम युवकांना व्यवसायाभिमुख दृष्टिकोणातून मार्गदर्शन करणे, त्यांना विविध कर्जाच्या योजनांची माहिती देणे, बँकेचे कर्ज मिळविण्यास मदत करणे, कच्चा माल पुरवण्याबाबत मदत करणे तसेच व्यवसाय सुरू केल्यानंतर २ वर्ष पर्यत त्यांच्याकडे लक्ष देणे.

**पात्र संस्था** : स्वयंसेवी संस्था , शासकिय महामंडळे संयुक्त उद्योग/ खाजगी क्षेत्र.

**मदतीचे स्वरूप** : प्रत्येक कार्यशाळेत ७५ हजार रूपयांपर्यंत अनुदान.

**अर्ज कोठे करावा** : कार्यकारी संचालक ,स्टर्लींग सेंटर, शिवसागर इस्टेट, एनी बेझंट रोड, वरळी, मुंबई.

**योजना क्र २१ : कारागीर संघटना नाबार्ड,**

**योजनेचा उद्देश** : विखुरलेल्या कारागीरांना एकत्रित करून त्यांची व्यावसायिक शक्ती वाढविणे.

**योजनेचे स्वरूप** : स्वयंसेवी संघटनांनी एखादे क्षेत्र निवडून त्यातील कारागीरांना एकत्रित करून त्यांच्या गरजा ओळखून त्यांना सुविधा पुरविणे व त्या सामुदयिक सुविधा संघटनेस सुपूर्द करणे.

**पात्र संस्था** : स्वयंसेवी संस्था, शासकिय संघटना, बँक, शैक्षणिक संस्था तसेच कामगार संघटना.

**मदतीचे स्वरूप** : कारागीरांचे सर्वेक्षण प्रशिक्षण, कॉमन शेड, मशीनरी व उपकरणे इत्यादींचा खर्च.

**अर्ज कोठे करावा** : कार्यकारी संचालक नाबार्ड, स्टर्लींग सेंटर, शिवसागर इस्टेट, एनी बेझंट रोड, वरळी, मुंबई.

**योजना क्र २२ : ग्रामीण महिलांना बिगरशेती व्यवसायासाठी मदत करणे नाबार्ड :-**

**योजनेचा उद्देश** : केवळ ग्रामीण महिलांसाठी महिला गटाला किंवा वैयक्तिक स्तरावर रोजगार उपलब्ध करून देणे.

**योजनेचे स्वरूप** : ग्रामीण महिलांना रोजगाराचे/ तंत्रज्ञाचे प्रशिक्षण देवून त्यांना घरबसल्या एकटे वा सहकारी तत्वावर किंवा दु-यम उद्योगाद्वारे त्यांचा आर्थिक विकास करणे.

**पात्र संस्था** : स्वयंसेवी संस्था/सेवाभावी संस्था/महिला विकास महामंडळ/ खादी ग्रामउद्योग/सहकारी संस्था.

**मदतीचे स्वरूप** : प्रकल्पास १०० टक्के संपूर्ण अनुदान आहे.

**अर्ज कोठे करावा** : कार्यकारी संचालक नाबार्ड स्टर्लींग सेंटर, शिवसागर इस्टैट, एनी बेझंट रोड वरळी मुंबई.

**योजना क्र २३ : बिगरशेती उत्पादन व व्यापार नाबार्ड :-**

**योजनेचा उद्देश** : ग्रामीण महिलांना बिगर शेती क्षेत्रात व्यवसायासाठी मदत करणे.

**योजनेचे स्वरूप** : बँकांमार्फत झालेल्या कर्ज पुरवठ्याचे बदलात नाबार्ड करून अंतर्गत १५ लक्ष रूपयांपर्यंत मदत दिली जाते.

**पात्र संस्था** : स्वयंसेवी संस्था/ सेवाभावी संस्था/ सहकारी संस्था.

**मदतीचे स्वरूप** : विक्री उलाढालीच्या २५ टक्के किंवा २५० लक्ष रूपये यापैकी जे कमी असेल ते अनुदान.

**अर्ज कोठे करावा** : कार्यकारी संचालक नाबार्ड स्टर्लींग सेंटर, शिवसागर इस्टेट,

एनी बेझंट रोड वरळी मुंबई.

**योजना क्र २४ : महिला स्वावलंबन योजना नोराड**

**योजनेचा उद्देश** : अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व भटक्या जाती या गटातील स्त्रियांना तांत्रिक शिक्षण देऊन स्वावलंबी करणे.

**योजनेचे स्वरूप** : ग्रामीण भागातील व शहरी झोपडपट्टी मधील स्त्रियांना कामाचे प्रशिक्षण व सुविधा पुरविणे.

**मदतीचे स्वरूप** : या योजनेकरीता ९५ टक्के अनुदान केंद्र सरकारद्वारे दिले जाते.

**पात्र संस्था** : नोंदणीकृत संस्था व न्यास.

**अर्ज कोठे करावा** : उपसचिव, नोराड, जीवनदीप बिल्डींग, संसद मार्ग, नवी दिल्ली.

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ , मुंबई यांचेकडून खालील योजनेवर कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.:-

खालील योजना फक्त अनुसूचित जातीतील चर्मकार कुटूंबासाठीच आहेत.

**१) योजनेचे नांव : कर्ज अनुदान योजना**

**योजनेचे स्वरूप** : आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटूंबातील व्यक्तिंना ज्या कुटूंबाचे ग्रामीण भागात वार्षिक उत्पन्न जास्तीत जास्त रूपये ११,०००/- व शहरी भागात रूपये ११,८००/- आहे. राष्ट्रीयकृत बँकेमार्फत रूपये २४०००/- पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या व्यवसायासाठी सवलतीच्या दराने अर्थ सहा-य दिले जाते. या अर्थसहा-यापैकी रूपये ६०००/- कमाल मर्यादेपर्यंत ५० टक्के कर्जाची रक्कम अनुदान म्हणून देण्यात येते. उर्वरित ५० टक्के कर्ज परत फेड ३६ ते ६० समान मासिक हप्त्यात बँकेकडे करावी लागते. बँकेकडून या योजनेखाली मिळणा-या कर्जाचा व्याजदर द.सा.द. शे. १२.५० टक्के ते १६.५० टक्के पर्यंत आकारला जातो.

**२) योजनेचे नांव : बीज भांडवल योजना**

**योजनेचे स्वरूप** : रूपये २४०००/- पेक्षा जास्त गुंतवणूक असणाऱ्या

व्यवसायासाठी बीज भांडवल योजने अंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज पुरवठा सवलतीच्या दराने उपलब्ध करण्यात येतो. या योजने अंतर्गत बँकेमार्फत करण्यात येतो. या योजने अंतर्गत रूपये ३५०००/- पर्यंत कर्ज घ्यावयाचे असल्यास त्यापैकी २५ टक्के रक्कम महामंडळामार्फत द.सा.द.शे. ४ टक्के व्याज दराने पुरविण्यात येते. उपरोक्त ७५ टक्के रक्कम महामंडळामार्फत १२.५० ते १६.५० टक्के व्याज दराने देण्यात येते. शिवाय बीज भांडवल म्हणून उपलब्ध केलेल्या रकमेपैकी रूपये ६०००/- पर्यंतची रक्कम ही अनुदान म्हणून दिली जाते. या योजने अंतर्गत मिळालेल्या कर्जाची परतफेड ३६ ते ६० समान मासिक हप्त्यांत अर्जदाराने करावयाची आहे.

रूपये ३५०००/- च्या वर रूपये २ लाख पर्यंत प्रकल्पाची गुंतवणूक असल्यास महामंडळाकडून फक्त २० टक्के रक्कम बीजभांडवल स्वरूपात येते. यापैकी रूपये ६०००/- पर्यंतची रक्कम हे महामंडळ अनुदान स्वरूपात येते. प्रकल्पाचा ५ टक्के रक्कम लाभार्थीनी स्वतःचा सहभाग म्हणून बँकेकडे जमा करावयाची आहे. उर्वरित ७५ टक्के रक्कम बँकेकडून कर्ज रूपाने १२.५० टक्के १३.५० टक्के दराने दिली जावून ३६ ते ६० समान मासिक हप्त्यात कर्जाची परतफेड बँकेकडे करावयाची आहे.

महामंडळाचे बीज भांडवलाची परतफेड विलंबाने केल्यास त्यावर द.सा.द.शे. २ टक्के अधिक दराने दंडव्याज आकारले जाते.

**३) योजनेचे नांव : ७ वी पास ते १० नापास झाल्यामुळे शाळा सोडलेच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण :-**

**योजनेचे स्वरूप** : ७ वी पास ते १० नापास झाल्यामुळे शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या महामंडळामार्फत विविध उद्योगाचे प्रशिक्षण दिले जाते.

१. शिवणकला २. ड्रायव्हिंग ३. फिटर ४. टर्नर ५. टू. व्हिलर ६. थ्री व्हिलर रिपेअरिंग ७. प्लंबर ८. टि.व्ही. रेडिओ रिपेअरिंग ९. मोटार ड्रायव्हिंग इत्यादी.

वर नमूद केलेल्या तांत्रिक शाखांमध्ये चर्मकार जातीच्या किमान ७वी इयत्ता पास केलेल्या परंतु इयत्ता १० वी ची परीक्षा नापास झालेल्या विद्यार्थ्यांना ६ महिन्याचे प्रशिक्षण महामंडळामार्फत देण्यात येते. ज्या विद्यांर्थ्यांना प्रशिक्षणासाठी महामंडळाने पुरस्कृत करावे असे वाटते अशा विद्यार्थ्यांनी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा- व्यवस्थापकांकडे विहीत नमुन्यामध्ये अर्ज करावयाचा असतो. या उद्योगासाठी सहा महिन्याचे प्रशिक्षणासाठी शासनमान्य संस्थेकडे सदर विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येते. प्रशिक्षण कालावधी सहा महिन्याचा असून

प्रशिक्षणाची फी प्रत्येक प्रशिक्षणासाठी दरमहा रूपये ५० टक्के या दराने प्रशिक्षण संस्थेत दिली जाते. प्रशिक्षणासाठी जाणा-या विद्यार्थ्यांस दरमहा रूपये १५०/- विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणार्थी रहात असणा-या ठिकाणा व्यतिरिक्त दुसऱ्या गावात प्रशिक्षण संस्था असल्यास विद्यावेतन रूपये २५०/- प्रती प्रशिक्षणार्थी प्रतीमहा दिले जाते. तथापि महानगरपालिका क्षेत्रातील प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणाखाली प्रति विद्यार्थी दरमहा रूपये ३००/- प्रमाणे विद्यावेतन दिले जाते.

**४) योजनेचे नांव : एस.एस.सी. पास उमेदवारांसाठी प्रशिक्षण**

**योजनेचे स्वरूप** :- एस.एस.सी. पास उमेदवारांसाठी लघुलेखन , टंकलेखन व संगणकाचे प्राथमिक शिक्षण शासनमान्य संस्थेमध्ये सदर प्रशिक्षणार्थी पाठवून केले जाते. लघुलेखन व टंकलेखनासाठी प्रति विद्यार्थी दरमहा जास्तीत जास्त रूपये २५०/- पर्यंत महामंडळ फी भरते. संगणकाचे सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रति विद्यार्थ्यामागे सहा महिन्याच्या पूर्ण कोर्ससाठी दरमहा रूपये ३५०/- याप्रमाणे सहा महिन्याचे प्रशिक्षण दिले जाते. १० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थी एस.एस.सी. पास विद्यार्थ्यांनाही विद्यावेतन त्याच दराने देण्यात येते.

प्रशिक्षणासाठी कुटूंबाच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रूपये १०,०००/- वरून रूपये २२,०००/- करण्यात आली आहे.

**५) योजनेचे नांव : आय. ए. एस/ आय.पी. एस. स्पर्धा परिक्षा पूर्व केंद्र :-**

**योजनेचे स्वरूप** : महामंडळामार्फत चर्मकार विद्यार्थ्यांना आय. ए. एस/आय.पी. एस. स्पर्धा परीक्षेला बसण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण मिळावे म्हणून विभागिय स्तरावर स्पर्धा परीक्षा पूर्व केंद्र सुरू करण्यात आलेली आहेत. सदर केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी आवश्यक असणारी पुस्तके विनामूल्य उपलब्ध व्हावीत म्हणून लायब्ररीमार्फत वाचनालयाची सोय करण्यात आली असून अशा केंद्रांतर्फे विद्यापीठ स्तरावरील तज्ञ प्राध्यापकांकरवी संबंधित स्पर्धा परीक्षेला असणाऱ्या काही विषयांचे मार्गदर्शन करण्यात येते. अशा केंद्रामधून एका वर्षाच्या कालावधीकरीता प्रती उमेदवारामागे सरासरी रूपये १५०००/- मर्यादेच्या अधिन राहून खर्च करण्यात येतो.

**६) योजनेचे नांव : पादत्राण व चर्म वस्तू उत्पादन प्रशिक्षण योजना :-**

**योजनेचे स्वरूप** : आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटूंबातील व्यक्तिंना तसेच पारंपारिक चर्मोद्योग कुटूंबातील व्यक्तीना पादत्राणे व चर्म वस्तू उत्पादन प्रशिक्षण महामंडळाचे दर्यापूर, हिंगोली व कोल्हापूर येथील पादत्राण व चर्म वस्तू उत्पादन केंद्रामधून देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटूंबातील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण फी म्हणून दरमहा

रूपये ५०/- संस्थेला देण्यासाठी व रूपये १५०/- विद्या वेतन म्हणून येईल. ग्राम पंचायत नगरपालिका हद्दीमधील बाहेरगावाच्या प्रशिक्षणार्थींना दरमहा रूपये ३००/- प्रमाणे विद्यावेतन देण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिन्यांचा असेल.

**७) योजनेचे नांव : चर्म प्रक्रिया प्रशिक्षण योजना :-**

**योजनेचे स्वरूप** : आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटूंबातील व्यक्तिंना तसेच पारंपारिक चर्मोद्योग करणाऱ्या कुटूंबातील व्यक्तिंना चर्म प्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण महामंडळाचे सातारा येथील चर्म प्रक्रिया केंद्रामध्ये देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीमध्ये आर्थिक दुर्बल कुटूंबातील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण फी म्हणून दरमहा रूपये ५०/- संस्थेला देण्यासाठी व रूपये १५०/- विद्यावेतन म्हणून देण्यात येईल. ग्राम पंचायत नगरपालिका हद्दीमधील बाहेरगावच्या प्रशिक्षणार्थींना रूपये ३००/- प्रमाणे विद्यावेतन देण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिन्यांचा असेल.

**८) योजनेचे नांव : चर्म वस्तू विक्री प्रशिक्षण योजना**

**योजनेचे स्वरूप** : महामंडळाचे वाशी, बांद्रा, जळगाव , धुळे, नांदेड, लातूर, सोलापूर येथे विक्री केंद्र असून तेथे चर्म वस्तू विक्री प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणार्थीसाठी दरमहा रूपये ५०/- या दराने प्रशिक्षण संस्थेत दिली जाते. प्रशिक्षणासाठी येणा-या विद्यार्थ्यांस दरमहा रूपये १५०/- विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणार्थी रहात असणा-या ठिकाणा व्यतिरिक्त दुस-या गावात प्रशिक्षण संस्था असल्यास विद्यावेतन रूपये २५०/- प्रति प्रशिक्षणार्थी दरमहा दिले जाते. तथापि महानगरपालीका क्षेत्रातील प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणासाठी प्रति विद्यार्थी दरमहा रूपये ३००/- प्रमाणे विद्यावेतन दिले जाते.

**९) योजनेचे नांव : एन.एस.एफ.डी.सी. मुदत कर्ज योजना :-**

**योजनेचे स्वरूप** :- रिक्षा, टुरिस्ट टॅक्सी, मिनी ट्रक, ट्रॅक्टर ट्रॉलीसह, फर्निचर कारखाना, झेरॉक्स मशिन ,धाबा, फॅब्रिकेशन युनिट, दुग्ध व्यवसाय, चामड्याच्या वस्तू व पादत्राणे निर्मिती कारखाना इत्यादी व्यवसायासाठी कर्ज पुरवठा करण्यात येतो.

या योजने अंतगर्त कर्ज मिळण्यासाठी एन.एस.एफ.डी.सी कडून एकूण प्रकल्प किंमतीच्या ७५ टक्के रक्कम द.सा.द.शे. ६ टक्के प्राप्त होते. २० टक्के भांडवलाची रक्कम महाराष्ट्र चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाकडून द.सा.द.शे. ४ टक्के दराने पुरविण्यात येते. अर्जदाराच्या स्वत:चा सहभाग प्रकल्प गुंतवणूकीचा ५ टक्के पर्यंत मर्यादित असतो. तथापि प्रकल्प गुंतवणूक रूपये १० लाखाच्या वर असल्यास अर्जदारांचा सहभाग ८ टक्के असतो.

एन.एस.एफ.डी.सी कडून मिळणाऱ्या कर्जाची परतफेड ६० समान मासिक हप्त्यात करावयाची असून कर्जाची रक्कम १० लाखापेक्षा जास्त असल्यास त्याची परतफेड करण्यासाठी ८ ते १० वर्षाच्या परतफेडीचा कालावधी मंजूर करण्यात येतो. कर्जाची परतफेड वेळेवर न केल्यास या कर्जावर २ दराने दंड व्याज आकारण्यात येते.

**१०) योजनेचे नांव : एन.एस.एफ.डी.सी ची बीज भांडवल योजना :-**

**योजनेचे स्वरूप** : अर्जदार राज्य वित्तीय महामंडळ वा इतर वित्तीय संस्थेचे मंजूर केलेल्या कर्जाच्या प्रमाणामध्ये अर्जदार स्वत:चा सहभाग भरण्यास असमर्थ असेल तर प्रकल्प किंमतीच्या २० टक्के राशी बीज भांडवल म्हणून कर्ज स्वरूपात मंजूर करण्यात येते. या योजने अंतर्गत जास्तीत जास्त ३० लाखापर्यंतचे प्रकल्प विचारात घेतले जातात व बीज भांडवलाच्या रकमेवर रूपया १ टक्के दराने सेवा शुल्क आकारले जाते. या बीज भांडवल कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ७ वर्षात करावयाची आहे.

**११) योजनेचे नांव : एन.एस.एफ.डी.सी. कडून मिळणारे बीज लोन :-**

**योजनेचे स्वरूप** : या योजने अंतर्गत ३० लाखापर्यंतचे प्रकल्प विचारात घेतले जातात. एखाद्या प्रकल्पात अनुदान दे-य असेल, परंतु प्रत्यक्षात ती रक्कम मिळण्यात काही अटींची पूर्तता करुन सदर अनुदान प्राप्त होण्यास जो कालावधी लागतो तो पर्यत राबविण्यात अडचण येवू नये म्हणून तेवढी रक्कम बीज लोन म्हणून मंजूर करता येईल उदा. अविकसित भागात उद्योग विभागामार्फत दिले जाणारे अनुदान यावरील व्याजाचा दर एन.एस.एफ.डी.सी. कडे थेट पाठविण्यात येईल असे हमीपत्र अनुदान देणाऱ्या संस्थेने किंवा विभागाचे द्यावयाचे आहे.

**१२) योजनेचे नांव : एन.एस.एफ.डी.सी ग्रामोद्योग वसाहत स्थापन करण्याबाबत योजना :-**

**योजनेचे स्वरूप** : चर्मकार लाभार्थींना महामंडळाद्वारे उपरोक्त योजनेद्वारे आर्थिक सहा-य मिळवून देण्यात येत असले तरी केवळ आर्थिक सहा-य अधिक लाभार्थिंना आर्थिक विकासासाठी पुरेसे नसून उद्योग व स्वयंरोजगार उभारणीकरीता लाभार्थ्यांना काही मुलभूत सोयीची आवश्यकता असते. या बाबी लक्षात घेता महामंडळामार्फत, ग्रामोद्योग वसाहत महामंडळामार्फत ग्रामोद्योग वसाहती स्थापन करण्यात येत आहेत. या वसाहतीमध्ये चर्मकार अर्जदाराचे उद्योग प्रस्थापित होणार असले तरी एकूण व्यवसायापैकी ९० टक्के व्यवसाय अनुसूचित जातीतील चर्मकार लाभार्थीचेच असतील.

ग्रामोद्योग वसाहतीमध्ये लाभार्थ्यांनी सुरू करावयाच्या उद्योगाची छाननी करून

लाभार्थ्यांनी सामुदायिकरित्या विकत घेतलेल्या जमिनीचे ले आऊट तयार करणे. बिनशेती परवानगी घेणे, पाणी, बीज इत्यादी सोयी पुरविण्यासाठी महामंडळ सहकार्य करते. या वसाहतीमध्ये उद्योग उभारण्यासाठी एन.एस.एफ.डी. या कंद्रीय आर्थिक विकास महामंडळांकडून त्यांच्या योजनेप्रमाणे किंवा बँकेमार्फत आर्थिक सहा-य द्यावयाचे आहे. या व्यवसायासाठी आवश्यक असणारा बीज भांडवलाचा पुरवठा महामंडळामार्फत द.सा.द.शे ४ टक्के व्याज दराने करण्यात येईल व ३६ ते ६० समान मासिक हप्त्यात त्याची वसूली केली जाईल.

**अर्जाच्या सोबत जोडावयाची कागदपत्रे**

जिल्हा व्यवस्थापकांना करावयाचा अर्जाचा नमुना जिल्हा व्यवस्थापक कार्यालयात रूपये २/- शुल्क देवून प्राप्त होवू शकेल. अर्ज भरून दिल्यानंतर त्यासोबत द्यावयाची कागदपत्रे खालीलप्रमाणे असावीत.

१. अर्जदार शैक्षणिक दाखला
२. अर्जदाराचा जातीचा दाखला (तहसीलदार यांचेकडून अथवा सक्षम अधिकारी)
३. अर्जदाराचा उत्पन्नचा दाखला (तहसीलदार यांचेकडून अथवा सक्षम अधिकारी)
४. नुकत्याच काढलेल्या पासपोर्ट साईज फोटोच्या दोन प्रती
५. रेशन कार्डाची झेरॉक्स प्रत
६. व्यवसायाच्या अनुषंगाने लागणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या किंमतीबाबतचे कोटेशन
७. ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल त्या जागेच्या उपलब्धतेबाबतचा पुरावा.
८. जागा भाड्याने मिळणार असल्यास तसे कारारपत्र
९. अर्जदारास व्यवसाय करण्यासाठी ग्राम पंचायत वा नगरपालिकेचा ना हरकत परवाना.

**योजनेच्या अटी व शर्ती** : १. अर्जदार अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील असावा. २. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. ३. अर्जदारचे वय १८ वर्षे पूर्ण असावयास हवे. ४. अर्जदार कोणत्याही वित्त संस्थेचा थकबाकीदार नसावा. ५. अर्जदाराने ज्या व्यवसायासाठी कर्जाची मागणी केली आहे. त्या व्यवसायाविषयी अर्जदारास त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव असावयास हवा-. (टीप : अर्ज प्राप्त करण्यासाठी चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या जिल्हा अथवा मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.)

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मुंबई

बॉम्बे लाइफ बिल्डीग, ५ वा मजला ४५, वीर नरीमन रोड, मुंबई ४००००१

**मा. आ. बबनराव घोलप माजी मंत्री समाजकल्याण, महाराष्ट्र शासन यांचे प्रयत्नाने झालेले शासन निर्णय :-**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचेकडून अनुसूचित जातीतील चर्मकार या समाजाकरीता राबविण्यात येणाऱ्या योजना महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ यांचेकडे हस्तांतरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग

शासन निर्णय क्र. च विम- १०९७/प्र.क्र.३६२/विषयो-२ मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०००३२ दिनांक - १७ ऑक्टोबर, १९९७

**वाचा :** १. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचे दि. ५ सप्टेंबर, पत्र क्र. - व्यसं- २०६६

२. समाजकल्याण , सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. - चविम - १०९७/प्र.क्र.३६२/विषयो-२, दिनांक १७ सप्टें ९७.

**शासन निर्णय** :- महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ, मुंबई हे प्रामुख्याने चर्मकार समाजातील व्यक्तिच्या सर्वांगिण विकासासाठी स्थापन झाले असून सदर महामंडळ शासन निर्णय , उद्योग , उर्जा व कामगार विभाग क्र. चविम - १०९५/ ६४६१/ उद्योग ५ दिनांक २४ जून १९९७ अन्वये समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळामार्फत चर्मोद्योग विकासाच्या संदर्भात व अनुसूचित जातीतील चर्मकार सामाजाच्या विकासाच्या योजना राबविण्यात येणार आहेत. राष्ट्रीय अनुसूचित जाती/जमाती विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत ज्या कर्ज पुरवठ्याच्या योजना हाती घेतल्या जातील, त्या योजना राबविण्याकरीता महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना प्राधिकृत वाहिनी म्हणून नेमणूक करण्यास शासनमान्यता यापूर्वीच देण्यात आली. केद्र शासन व राज्य शासन अनुदानित व पुरस्कृत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या विकासाच्या पुढील योजना सद्य:स्थितीत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचेकडून राबविण्यात येत होत्या. अशा योजना महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाकडे वर्गीकृत करण्याचा प्रस्ताव शासन विचाराधीन होता.

१) ५० टक्के अनुदान योजना. २) बीज भांडवल योजना. ३) प्रशिक्षण योजना. ४) सहकारी संस्थेचे भाग खरेदीसाठी कर्ज योजना. ५) आयएसएस /आयपीएस परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना. ६) गट प्रकल्प योजना. ७) व्याज अनुदान योजना. ८) ग्रामोद्योग वसाहत योजना. ९) पायलट प्रशिक्षण योजना

उपरोक्त विषयाबाबत या शासन निर्णयाद्वारे महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचेकडून चर्मकार समाजाच्या (यामध्ये चांभार ढोर, मोची, चांभार, वगैरे चर्मोद्योग करणाऱ्या जातीचा समावेश असेल.) विकासाकरीता राबविण्यात येणाऱ्या वरील योजना व तत्सम योजना महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर योजना सन १९९७/९८ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाकडे वर्गीकृत करण्यात याव्यात व याकरीता आवश्यक असलेल्या निधीबाबत वेगळे आदेश निर्गमित करण्यात येईल. सबब सन १९९६/ ९७ पर्यंतच्या उपरोक्त योजना बाबतची जवाबदारी संबंधित महामंडळाकडे राहील. व सन १९९७.९८ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव संबंधित महामंडळाने महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाकडे हस्तांतरीत करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.
सही/सचिव समाजकल्याण

राष्ट्रीय अनुसूचित जाती /जमाती वित्त विकास महामंडळ , नवी दिल्ली यांच्या योजनांची अंमल बजावणी करण्याकरीता प्राधिकृत वाहिनी म्हणुन महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ यांची नियुक्ती करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. चविम १०९७/प्र.३२६/विघयो-२, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२. दिनांक - १७ स्पटेंबर, १९९७.

**शासन निर्णय** : महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ, मुंबई हे प्रामुख्याने चर्मकार समाजातील व्यक्तिंच्या सर्वांगिण विकासासाठी स्थापन झालेले आहे व हे महामंडळ शासन निर्णय, उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. चविम १०९५/(६४६१)/उद्योग-५, दि. २३ जुन ९६ अन्वये समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळामार्फत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या विकासाच्या योजना राबविण्यात येत असल्यामुळे राष्ट्रीय अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांचेमार्फत ज्या कर्जपुरवठ्याच्या योजना हवी

घेतल्या जातील, त्या योजना राबविण्याकरीता महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना प्राधिकृत वाहिनी म्हणुन नेमणूक करण्यास शासन मान्यता देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,
शासनाचे सचिव

**गटई कामगारांना स्टॉल देण्याची योजना :-**

**महाराष्ट्र शासन,** समाजकल्याण , सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र विघयो- १०९७/ प्र क्र १७५ / मावक-२, मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०००३२, दिनांक ३१ डिसें. १९९७

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यामध्ये चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरूस्तीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनुसूचित जातीच्या व्यक्ति असून त्यांच्या उपजिवीकेचा प्रश्न यांच्याशी निगडीत आहे. हे पादत्राणे दुरूस्ती करणारे व्यावसायिक हे रस्त्याच्या कडेला उन्हापावसात बसून आपली सेवा देत असतात. या व्यावसायिकांना ऊन, वारा, पाऊस यांपासून संरक्षण मिळावे, तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी, यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्रात १०० टक्के शासकिय अनुदानातून पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना राबविण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :** १) वरील सर्व बाबींचा विचार करून पादत्राणे दुरूस्ती करणारे गटई कामगारांना त्यांची आर्थिक व सामाजिक उन्नती साधण्यासाठी १०० टक्के अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल व रू ५००/- इतके रोख अनुदान देण्याचा निर्णय सन १९९७-९८ या वर्षापासून तत्वत: घेण्यात येत आहे. २) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेच्या नियम व अटी ह्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट - 'अ' मध्ये नमुद केलेल्या आहेत. ३) या योजनेवर होणारा खर्च हा मागणी क्र एन-७,२२२५ अनुसूचित जाती अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग याचे कल्याण, ०१ अनुसूचित जातीचे कल्याण, १०२- आर्थिक विकास, ४(बी) पंचवार्षिक योजनातर्गत योजना, गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना (विघयो) या विशेष घटक योजनेच्या लेखाशिर्षाखाली खर्च टाकण्यात येवून प्रतिवर्षी विशेष घटक योजनेच्या निधीमधून हा खर्च भागविण्यात यावा. ४) ही राज्यस्तरीय योजना असून यावर होणारा खर्च हा विशेष घटक योजनेमधील करण्यात आलेल्या तरतुदीमधून सन १९९७/९८ या सालासाठी भागविण्यात यावा. ५) महाराष्ट्र (तृतिय पुरवणी) विनियोजन अधिनियम १९९७ अन्वये या योजनेसाठी रू. १,५०,००,०००/- इतका निधी मंजूर

झालेला असून सदर निधी संचालक, समाजकल्याण यांचेकडे सुपूर्त करण्यात येत आहे. या निधीमधून सुचालक, समाजकल्याण यांनी प्रत्येक जिल्ह्याला रू. ५,००,०००/- इतक्या निधीची (३० जिल्ह्यासाठी) वाटप करावे. ६) हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सम्मतीने अनौ. संदर्भ क्र प्र क्र ११४६ /त्यय..११ दि ०४.११.९७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल याचे आदेशानुसार व नावाने,

## परिशिष्ट 'अ'

शासन निर्णय समाजकल्याण , सांस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग क्र विघयो १०९७/ प्र क्र१७५/मावक -२ दि ३१ डिसें. ९७ चे सहपत्र.

### गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेचे नियम व अटी

**१) योजना :** राज्यातील गटई कामगारांना १०० टक्के अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल व रू ५००/- इतके रोख अनुदान सन ९७-९८ या वर्षापासून देण्यात येणार आहे.

**२) लाभार्थ्यांची पात्रता :** अ) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा.

ब) अर्जदाराच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न हे ग्रामीण भागात रू २२,०००/- व शहरी भागात रू २३६००/- पेक्षा अधिक नसावे.

क) अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

ड) अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत नगरपालिका यांनी त्यास भाड्याने, कराराने , खरेदीने अगर मोफत परंतू अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती त्यांच्या स्वमालकीची असावी.

**३) योजनेची व्याप्ती :**

अ) सन १९९७.९८ या वर्षात ही योजना ग्रामीण भाग व क वर्ग नगरपालीका क्षेत्रात (ज्या ठिकाणी लोकसंख्या १०००० पेक्षा जास्त आहे) राबविण्यात येत आहे.

**४) लाभार्थ्यांची निवड :** अ) सर्व जिल्हा समाजकण्याण अधिकारी स्थानिक वृत्तपत्रात तसेच स्थानिक प्रसिध्दी माध्यमाद्वारे या योजनेला व्यापक प्रसिध्दी देतील.

ब) प्रसिध्दीनंतर विहित नमुन्यात अर्ज मागवून घेतील (अर्जाचा नुमुना सोबत परिशिष्ट ब येथे जोडला आहे.) सर्व अर्जाची छाननी करून वरील परिच्छेद २ येथील पात्रतेचे नियम पूर्ण करणाऱ्या पात्र अशा ५० लाभार्थ्याची निवड सोडतीद्वारे करतील.

क) अर्ज वाटपाचे वेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रत्येक अर्जावर अनुक्रमांक सिरियल नंबर १,२,३ असे ठळकपणे नमूद करतील.

ड) ही योजना प्रथम वर्षी प्रथमच राबविण्यात येत असल्याने चालू वर्षी , प्रत्येक जिल्ह्यातून फक्त ५० लाभार्थ्याचीच निवड जिल्हा समाजकल्याण अधिकारी करतील.

ई) पुढील वर्षापासून निधीच्य उपलब्धतेनुसार व योजनेच्या यशापयशाप्रमाणे लाभार्थ्याचा संख्येत वाढ करणे, कमी करणे याचा निर्णय शासन स्वतंत्रपणे घेईल.

फ) प्रत्येक जिल्ह्याला शासनाने ठरवून दिलेल्या लाभार्थ्याचें संख्येप्रमाणे शासनाकडून स्टॉल उपलब्ध करून दिले जातील. संबंधित जिल्हा समाजकल्याण अधिकारी पात्र लाभार्थ्यांना सदर स्टॉलचे वाटप करतील.

स्टॉल ४ फूट लांब - ५ फूट रूंद - ६ फूट उंच असेल.

सदरचे स्टॉल बनविण्यासाठी कमीतकमी २० गेज जाडी वा लोखंडी पत्रा वापरण्यात येईल.

**५) इतर :**

आपल्या जिल्ह्यात या योजने अंतर्गत देण्यात आलेल्या स्टॉलची पाहणी संबंधीत जिल्हा समाजकल्याण आधिकारी किंवा त्यांचे प्रर्यवेक्षकीय आधिकारी वर्षातून एक वेळा करतील. ज्या कारणासाठी हा स्टॉल देण्यात आलेला आहे. त्याशिवाय इतर काही उद्योगासाठी जर हा स्टॉल वापरण्यात आला तर तो स्टॉल रद्द करून तो पुढील अनुक्रमांकाच्या लाभार्थ्यास देण्यास येईल. एकदा लाभार्थ्याला स्टॉलचा लाभ दिल्यानंतर त्या स्टॉलची देखभाल व त्याची दुरूस्ती इत्यादी बाबी संबंधीत लाभार्थ्यानें स्वत:करणे आवशयक राहील.